# सातार्‍यात W-20 अंतर्गत बचतगटातील महिलांसाठी कार्यशाळा व प्रदर्शन दि.१० रोजी

आपले साम्राज्य

सातारा (अजित जगताप) - भारत सरकारने एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाला शैक्षणिक भागीदार म्हणून W-20 चे आयोजन करण्याची घोषणा केली असून या अनुषंगाने या विद्यापीठाने काही निवडक महाविद्यालयांची निवड W-20 आयोजनासाठी केली आहे. यामध्ये महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे एस्. एन्. डी.टी. महिला विद्यापीठ संलग्नीत कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन फॉर विमेन, सातारा येथे W-20 अंतर्गत बचतगटातील ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यशाळा व प्रदर्शनाचे आयोजन दि. १० ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती डॉ.समीक्षा निकम, मधुरा काळे, प्रजुंम आगटे ,डॉ.अंजली साळुंखे, डॉ.धनंजय विधाते यांनी दिली.



ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांच्या उत्पादनांसाठी डिजीटल स्वरुपाची बाजारपेठ उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. याच धर्तीवर महाविद्यालयाने उद्योजकता या विषयांतर्गत "एक पाऊल सक्षमतेकडे" कार्यशाळा व प्रदर्शनाचे आयोजन करण्याचे ठरविले आहे.

या अनुषंगाने कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांसाठी ग्रामीण पर्यावरण व आधुनिक तंत्रज्ञान या विषयाची कार्यशाळा घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ग्रामीण महिलांना उद्योजकीय प्रेरणा देत सध्याच्या या डिजीटल युगात महिलांना जागतिक बाजारपेठ विषयक ज्ञान देण्याचे काम या माध्यमातून होणार आहे. थोडक्यात, या महिलांच्या बचतगटातील उत्पादनांची जाहिरात व विक्री विविध प्रसार माध्यमातून लोकांपर्यंत कशा पध्दतीने पोहोचविता येईल, तसेच त्यांच्या उत्पादनाला विस्तृत बाजारपेठ कशी उपलब्ध होईल याचे मार्गदर्शन देण्यात येणार आहे. तसेच या कार्यशाळेचा सर्व अहवाल केंद्र शासना कडे पाठविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास सातारा जिल्हा ग्रामीण यंत्रणा प्रकल्पातील सर्वसाधारण १०० महिला व त्यांचे विविध गावातील बचतगट उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेसोबतच बचतगटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांचे डिजीटल स्वरुपातील सक्षमीकरण करण्यासाठी टाकलेले हे एक पाऊल आहे. सदर कार्यक्रमासाठी डॉ. नलिनी पाटील, श्री. संतोष हराळे, प्रोजेक्ट डायरेक्टर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, सातारा यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या वेळी आयुर्वेदानुसार औषध ॲप उद्‌घाघाटन केले जाणार आहे. डॉ कल्याणी बारटक्के या समन्वयक आहेत.



# सातार्‍यात W-२० अंतर्गत बचतगटातील महिलांसाठी कार्यशाळा व प्रदर्शन दि.१० रोजी



ग्रामोध्दार वृत्तसेवा

**सातारा (अजित जगताप) :** भारत सरकारने एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाला शैक्षणिक भागीदार म्हणून W-२० चे आयोजन करण्याची घोषणा केली असून या अनुषंगाने या विद्यापीठाने काही निवडक महाविद्यालयांची निवड W-२० आयोजनासाठी केली आहे. यामध्ये महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे एस्. एन्. डी.टी. महिला विद्यापीठ संलग्नीत कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन फॉर विमेन, सातारा येथे W-२० अंतर्गत बचतगटातील ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यशाळा व प्रदर्शनाचे आयोजन दि. १० ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती डॉ.समीक्षा निकम, मधुरा काळे, प्रजुंम आगटे ,डॉ.अंजली साळुंखे, डॉ.धनंजय विधाते यांनी दिली.

ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांच्या उत्पादनांसाठी डिजीटल स्वरुपाची बाजारपेठ उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. याच धर्तीवर महाविद्यालयाने उद्योजकता या विषयांतर्गत एक पाऊल सक्षमतेकडे कार्यशाळा व प्रदर्शनाचे आयोजन करण्याचे ठरविले आहे.

या अनुषंगाने कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांसाठी ग्रामीण पर्यावरण व आधुनिक तंत्रज्ञान या विषयाची कार्यशाळा घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ग्रामीण महिलांना उद्योजकीय प्रेरणा देत सध्याच्या या डिजीटल युगात महिलांना जागतिक बाजारपेठ विषयक ज्ञान देण्याचे काम या माध्यमातून होणार आहे. थोडक्यात, या महिलांच्या बचतगटातील उत्पादनांची जाहिरात व विक्री विविध प्रसार माध्यमातून लोकांपर्यंत कशा पध्दतीने पोहोचविता येईल, तसेच त्यांच्या उत्पदनाला विस्तृत बाजारपेठ कशी उपलब्ध होईल याचे मार्गदर्शन देण्यात येणार आहे. तसेच या कार्यशाळेचा सर्व अहवाल केंद्र शासना कडे पाठविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास सातारा जिल्हा ग्रामीण यंत्रणा प्रकल्पातील सर्वसाधारण १०० महिला व त्यांचे विविध गावातील बचतगट उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेसोबतच बचतगटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांचे डिजीटल स्वरुपातील सक्षमीकरण करण्यासाठी टाकलेले हे एक पाऊल आहे.

सदर कार्यक्रमासाठी डॉ. नलिनी पाटील, संतोष हराळे, प्रोजेक्ट डायरेक्टर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, सातारा यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या वेळी आयुर्वेदानुसार औषध प उद्घाटन केले जाणार आहे. डॉ कल्याणी बारटक्के या समन्वयक आहेत.

ऐक्य

# दि. १० रोजी साताऱ्यात जी-२० अंतर्गत बचतगटातील महिलांसाठी कार्यशाळा व प्रदर्शन

सातारा, दि. ७ : भारत सरकारने एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाला शैक्षणिक भागीदार म्हणून जी-२० चे आयोजन करण्याची घोषणा केली असून या अनुषंगाने या विद्यापीठाने काही निवडक महाविद्यालयांची निवड जी-२० आयोजनासाठी केली आहे. यामध्ये महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन फॉर विमेन, सातारा येथे जी-२० अंतर्गत बचतगटातील ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यशाळा व प्रदर्शनाचे आयोजन दि. १० ऑगस्ट २०२३ रोजी करण्यात आले आहे, अशी माहिती डॉ. समीक्षा निकम, मधुरा काळे, प्रजुंम आगटे,डॉ. अंजली साळुंखे व डॉ.धनंजय विधाते यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांच्या उत्पादनांसाठी डिजिटल स्वरूपाची बाजारपेठ उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. याच धर्तीवर महाविद्यालयाने उद्योजकता या विषयांतर्गत एक पाऊल सक्षमतेकडे कार्यशाळा व प्रदर्शनाचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. या अनुषंगाने कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांसाठी ग्रामीण पर्यावरण व आधुनिक तंत्रज्ञान या विषयाची कार्यशाळा घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ग्रामीण महिलांना उद्योजकीय प्रेरणा देत सध्याच्या या डिजिटल युगात महिलांना जागतिक बाजारपेठविषयक ज्ञान देण्याचे काम या माध्यमातून होणार आहे. थोडक्यात, या महिलांच्या बचतगटातील उत्पादनांची जाहिरात व विक्री विविध प्रसारमाध्यमातून लोकांपर्यंत कशा पध्दतीने पोहोचविता येईल तसेच त्यांच्या उत्पादनाला विस्तृत बाजारपेठ कशी उपलब्ध होईल याचे मार्गदर्शन देण्यात येणार आहे. तसेच या कार्यशाळेचा सर्व अंहवाल केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सातारा जिल्हा ग्रामीण यंत्रणा प्रकल्पातील सर्वसाधारण १०० महिला व त्यांचे विविध गावातील बचतगट उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेसोबतच बचत-गटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बचतगटातील महिलांचे डिजिटल स्वरूपातील सक्षमीकरण करण्यासाठी टाकलेले हे एक पाऊल आहे. कार्यक्रमासाठी डॉ. नलिनी पाटील, संतोष हराळे, प्रोजेक्ट डायरेक्टर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, सातारा यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सकाळ

सातारा

सातारा, मंगळवार, ८ ऑगस्ट २०२३

## → दृष्टिक्षेपात

# बचत गटातील महिलांसाठी साताऱ्यात गुरुवारी कार्यशाळा

**सातारा :** केंद्र सरकारने एसएनडीटी महिला विद्यापीठांना शैक्षणिक भागीदार म्हणून घेत डब्ल्यू २० चे आयोजन करण्याच्या सूचना केल्या आहेत. यानुसार साताऱ्यातील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन फॉर वूमन येथे ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांसाठी कार्यशाळा, प्रदर्शनाचे आयोजन गुरुवारी (ता. १०) करण्यात आल्याची माहिती संयोजकांच्या वतीने प्रा. डॉ. समीक्षा निकम यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. या वेळी प्रद्युम्न आगटे, मधुरा काळे, डॉ. अंजली साळुंखे, डॉ. धनंजय विधाते आदी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. निकम म्हणाल्या, "भारताकडे डब्ल्यू २० चे अध्यक्षपद असून, याअंतर्गत देशभरात बैठका, प्रशिक्षणे, चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. याद्वारे भारतीय संस्कृती, कला व संस्काराची माहिती जगाला करून देण्यात येत आहे. याच अनुषंगाने ग्रामीण भागातील बचत गटांत असणाऱ्या महिलांना त्यांच्या उत्पादित मालासाठीची बाजारपेठ डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून या कार्यशाळेचे तसेच प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी जिल्हा ग्रामीण यंत्रणा प्रकल्पातील १०० महिला आणि त्यांच्या बचत गटांना आमंत्रित करण्यात आले आहे. या महिलांना डिजिटलच्या माध्यमातून उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत कसे स्थान मिळवायचे? याबाबतची माहिती देण्यात येणार असल्याचेही यावेळी संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.